## उल्लेखनीय बाबी

### क्रीडा स्पर्धा :-

१. सन २००७ -२००८ या शै.वर्षात प्रकल्पस्तरावर झालेल्या पेंढरघोळ येथील क्रीडा स्पर्धेत ३० आश्रमशाळा सहभागी झाल्या होत्या. सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धेमध्ये आपल्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम द्वितीय, क्रमांकासह सहा पदकांचे यश संपादन केले.

२. कर्नाळा स्पोर्टस क्लब पनवेल येथे आदिवासी विकास, अप्पर आयुक्तालय ठाणे यांनी आयोजित केलेल्या विभागीय क्रीडास्पर्धेत आपल्या शाळेतील तीन विद्यार्थ्यांची निवड झालेली होती. त्यामध्ये २ विद्यार्थ्यांची निवड राज्यस्तरावर झाली होती.

### चित्रकला स्पर्धा :-

मुद्रा कला ॲकॅडमी, वाशी, नवी मुंबई यांनी आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत मुंबईतील एकूण ८० शाळांमधील १०,००० विद्यार्थी सहभागी झाले होते. या शहरी भागातील ८० शाळांमध्ये आपली वनवासी भागातील एकमेव आश्रमशाळा होती. या स्पर्धेत १०० चित्रांची निवड करण्यात आली. यामध्ये आपल्या शाळेतील १० चित्रांची निवड होऊन ती प्रदर्शनामध्ये लावण्यात आली होती.

### सैनिकी शिक्षण शिबीर :-

जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे या संस्थेमार्फत शिरोळ, ता. शहापूर येथे आयोजित केलेल्या सैनिकी प्रशिक्षण शिबीरात आपल्या शाळेतील विद्यार्थ्याने रौप्य पदकासह प्रथम क्रमांक मिळविला.

### एकलव्य रेसिडेंशिअल स्पर्धा :-

सन २००६-२००७ मध्ये प्रकल्प स्तरीय एकलव्य रेसिडेंशिअल स्पर्धेत इ. ४ चा विद्यार्थी कु. मोहन मधे याने विशेष प्राविण्य मिळविल्याने त्याची निवड महाराष्ट्र मिलिटरी स्कूल, तळवली, ता. मुरबाड या ठिकाणी झाली.
तालुका व जिल्हास्तरीय होणाऱ्या विविध स्पर्धेत आपली शाळा नेहमीच उल्लेखनीय यश संपादन करीत आली आहे.

## आश्रमशाळेची नियोजित कामे (बाबी)

| | तपशील | अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|
| १. | मुलांचे भोजन कक्ष | १० लाख |
| २. | बहुउद्देशीय सभागृह | १५ लाख |
| ३. | कर्मचारी/शिक्षक निवास | २० लाख |
| ४. | कुंपण (वॉल कंपाऊंड) | १० लाख |
| ५. | पाण्याची व्यवस्था (विहीर/कूपनलिका) | ५ लाख |
| ६. | व्यायाम शाळा | ५ लाख |
| ७. | रस्ता | ४ लाख |
| ८. | सौरऊर्जा यंत्रणा | ४ लाख |
| ९. | प्रयोगशाळा सुसज्जीकरण | ३ लाख |

मुंबईहून अंतर -१२५ कि.मी (कसारा हायवे),
कसारा स्टेशनपासून १३ कि.मी.
नाशिकहून अंतर - ७७ कि.मी.



कार्यालये, वाचनालय, विज्ञान, संगणक
प्रयोग शाळेचे बांधकाम

।। उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत ।।

राष्ट्रीय शिक्षण संस्था, डोंबिवली संचालित

# स्वामी विवेकानंद आदिवासी आश्रमशाळा

## चिंध्याची वाडी
## पो. वाशाळा, ता. शहापूर, जि.ठाणे

